उत्तरप्रदेश,झारखंड मधील मजदुर बांधवांना आपल्या मायदेशी परतण्याकरीता मा.श्री चंदनसिंह चंदेल यांचा मदतीचा हाथ.

या वैश्विक महामारी मुळे संपूर्ण देश लॉक डाऊन झाले आहेत व यामुळे प्रत्येक राज्यात,जिल्ह्यात मजदुर बांधव अडकले आहेत.बल्लारपूर येथे अडकून असलेले उत्तरप्रदेश,झारखंड येथील मजदुर बांधव यांना त्यांच्या राज्यात स्वघरी परतण्यास मा.श्री चंदनसिंह चंदेल माजी अध्यक्ष, वनविकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य यांनी माणुसकीचा धर्म पाळत पुढाकार घेत मोलाची मदत केली. या कठिण काळात आदरणीय बाबुजी यांनी सर्वप्रथम त्या मजदुर बांधवांची संपूर्ण माहिती घेऊन त्यांना कायद्याच्या चौकटीत राहून सर्वांना त्यांच्या गावी पाठवण्याचा शब्द दिला. माजी अर्थमंत्री तथा माजी पालकमंत्री मा.आ श्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात मा.श्री चंदनसिंह चंदेल यांच्या पुढाकारातून व मार्गदर्शनात भाजपा युवा नेता शहर सचिव इंजि. देवेंद्र वाटकर , श्री किशोर मोहुरले भाजपा युवा नेता तथा शिक्षक,श्री श्रीकांत उपाध्याय समाजसेवी व शिक्षक यांनी स्थानिक प्रशासन सोबत तालमेल करून मजदुर बांधवांची उत्तरप्रदेश येथील चित्रकूट,बांदा,फतेहपुर जिल्हा व झारखंड येथील रांची जिल्हा करिता वैद्यकीय तपासणी करून ई पास बनविले.त्यांना त्यांच्या स्वघरी पाठवण्यासाठी दोन बस(प्रत्येकी ४० सिटर बस) ची व्यवस्था करून आर्थिक स्वरूपात सहाय्य केले.या दोन्ही बस मध्ये ४० लोकांना बसवून दि.१६/५/२०२० ला आदरणीय बाबुजी यांच्या मार्गदर्शनात रात्री १०:०० वा रवाना केली व दि. १८/५/२०२० ला सकाळी ९:३० वाजे पर्यंत समस्त मजदुर बांधव यांना त्यांच्या जिल्ह्यात सोडले. तो षण मजदुर बांधवांनसाठी अतिशय सुखदायी व आनंदाचा होता. आपल्या गावात पोहचण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर त्यांच्या संभाषणातून जाणवत होता.प्रसंगी सर्वांनी आदरणीय बाबुजी यांचे मनस्व आभार व्यक्त केले.घरी सुखरूप पोहचले हि बातमी मिळताच बाबुजी यांचे चित्त देखील शांत झाले व त्यांनी देवा वाटकर, किशोर मोहूरले, श्रीकांत उपाध्याय यांचा आशिर्वाद रुपी शब्दाने अभिनंदन केले. विशेष म्हणजे हा मजदुर बांधवांचा ३ जत्था होता. या प्रसंगी बल्लारपूर स्थानीक प्रशासनातील उपविभागीय अधिकारी,तहसीलदार,नायब तहसीलदार,पोलीस निरीक्षक,मुख्याधिकारी न.प. या सर्वांची योग्य मदत व सहकार्य प्राप्त झाले.